**प्रति,**

**मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,**

**विषय :- <u>मोर्चे, आंदोलन, शिष्टमंडळ याविषयी आचारसंहिता विषय अहवाल.</u>**

**संदर्भ :- १) दिनांक. २१/०३/२०११ रोजी ताराराणी सभागृहात सर्व विभाग प्रमुख, कर्मचारी संघटनेच्या प्रतिनिधी बैठकीत ठरल्याप्रमाणे.**

**२) मा. अपर जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर यांचेकडील अभिप्राय.**

**३) सहसचिव, मध्यवर्ती संघटना, मंत्रालय, मुंबई व सरचिटणीस जिल्हा शाखा, कोल्हापूर यांचे दि. २२/०३/२०१२ रोजीचे पत्र.**

**४) अध्यक्ष व सचिव, प्रजासत्ताक सामाजिक सेवा संस्था, कोल्हापूर यांचे दि. २७/०३/२०१२ रोजीचे पत्र.**

**५) श्री. शशिकांत शा. भोसले, शिपाई जिल्हा नियोजन कार्यालय यांचे पत्र दि. २५/०३/२०१२.**

**महोदय,**

समाजातील अनेक नागरिक, नागरिकांचा समुह, राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, कामगार, शेतकरी, शेतमजूर , महिला संघटना, मोलकरीण संघटना, अधिकारी कर्मचारी संघटना इ. अनेक प्रकारच्या संघटना किंवा वैयक्तिक नागरिक त्यांचे गा-हाणे मांडण्यासाठी किंवा अडचणी कथन करण्यासाठी शासकीय / निमशासकीय केंद्र व राज्यशासनाच्या कार्यालय प्रमुख किंवा सक्षम प्राधिका-याकडे भेटी देतात.

साधारणपणे वैयक्तिक स्वरुपाची अडचण असल्यास ती व्यक्ती स्वत: कार्यालयप्रमुखाशी भेटते किंवा संबंधित कार्यासनाकडे जाऊन चौकशी करते. शिवाय एकापेक्षा अधिक नागरिकांचा सामुहिक स्वरुपाचे प्रश्न / मागण्या असल्यास शिष्टमंडळाच्या स्वरुपात भेटी देण्याचा प्रयत्न करतात. सामाजिक संघटना सामाजिक कार्यकर्त्यामार्फत सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक अथवा शासन धोरण व निर्णयाविरुध्द दाद मागण्यासाठी किंवा लक्ष वेधण्यासाठी मोर्चा / मेळावे / आंदोलने / उपोषण या वेगवेगळया स्वरुपात आयोजन करुन संबंधित विभागाचे लक्ष वेधून प्रश्न सोडविण्यासाठी आंदोलन करतात. सर्वसाधारणपणे हे सर्व शिष्टमंडळ / मोर्चे हे तालुका स्तरावर तहसिलदार व जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चे काढून लक्ष वेधण्याचा प्रयत्न करतात. कारण ही कार्यालये शासनाचे प्रतिनिधित्व करणारे व सर्व समांतर कार्यालयामध्ये समन्वय घडवून आणणारे व राज्याच्या प्रशासनाचा प्रमुख कणा म्हणून निवेदन देवून त्यांच्याकडून प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करतात.

-------२/-

भारतीय राज्यघटनेच्या परिच्छेद १९ नुसार अभिव्यक्ती स्वातंत्र्यामुळे म्हणजेच मुलभूत हक्काद्वारे त्यांचे म्हणणे लेखी अथवा भाषणाद्वारे अथवा तोंडी कथनाद्वारे मांडण्याचा मूलभूत हक्क प्रत्येक नागरिक / संघटनांना आहे. तसेच परिच्छेद ५१ नुसार नागरिकांची कर्तव्ये सुध्दा नमूद आहेत. म्हणजेच Liberty is not license. म्हणजेच आपले म्हणणे शांतपणे कोणासही उपद्रव न होता, सांविधानिक मार्गाने निदर्शने / निषेध करण्याचा हक्क आहे. परंतु अशा शिष्टमंडळांना ज्या प्राधिकाऱ्यांकडे निवेदन द्यावयाचे असते ते अधिकारी दौ-यावर अथवा इतरत्र सभेत / बैठकीत किंवा रजेवर असल्याने अशा शिष्टमंडळांना भेट न झाल्याने गा-हाणे मांडण्यासाठी आलेल्यांना गैरसोय होते व नाराजी सुध्दा येते. प्रसंगी उद्वेगाने त्या कार्यालय परिसरात घोषणा, अपशब्द किंवा दंगा करण्याचा प्रयत्न काही समुहाकडून झाल्याचे ताराराणी सभागृहात झालेल्या बैठकीत काही अधिका-यांनी कथन केले.

काही वेळा पोलीस प्रशासन अथवा ज्या अधिका-याकडे निवेदन द्यावयाचे आहे त्यांना पूर्वकल्पना न देताच आकस्मिकपणे काही संघटना थेट कार्यालय गाठतात, आत घुसतात, अधिकारी जागेवर नसल्यास रागाने खुर्च्या, फर्निचरची तोडफोडही करतात. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या खिडक्याची काच फोडण्याचा प्रकारही मागील काळात झाल्याचे काही अधिका-यांनी सांगितले. प्रदुषण नियंत्रण मंडळ, C. P. R. दवाखाना, सहनिबंधक सहकार खाते, जिल्हाधिकारी कार्यालयावर साधारणपणे हे प्रकार घडून आले आहेत.

आंदोलनकर्त्यांचे म्हणणे असते की, प्रशासन असंवेदनशील असल्याने वेळीच त्या प्रश्नाकडे लक्ष दिले असते तर त्यांना असे वर्तन करण्याची वेळ आली नसती तर दुसरीकडे प्रशासकीय अधिकारी सांगतात की काही वेळा धोरणात्मक निर्णय वरिष्ठ पातळीवर व्हावयाचे असतात अथवा शासन स्तरावरुन निर्णय घ्यावयाचे असतात. तसेच अधिकारी हा कार्यालयात एकटाच व शिष्टमंडळातील सर्वजण एकाच वेळी आकस्मिकपणे कार्यालयात घुसून आताच झाले पाहिजे, आताच निर्णय द्यावा यासाठी आग्रही असतात. अशावेळी काही अप्रिय घटना घडतात. जसे तोंडाला काळे फासणे, अस्वच्छ पाणी पाजणे, गढूळ पाण्याची आंघोळ घालणे, कार्यालयातच बैठा सत्याग्रह करणे, शिवीगाळ करणे, धमकी देणे, इत्यादी प्रकार घडतात हे विविध माध्यमातून प्रसारित झालेल्या बातम्यातून कळते.

दैनंदिन प्रशासकीय कामाचा ताण, रिक्त जागा, विविध उपक्रम राबविताना काही प्रकरणे प्रलंबित असल्यास किंवा काही कार्यालयामध्ये दप्तर दिरंगाईमुळे जाणीवपूर्वक प्रकरणे प्रलंबित ठेवण्याचा प्रकारही घडतो. त्यामुळे नागरिकांमध्ये असंतोष निर्माण होतो ही वस्तुस्थिती आहे.

-------३/-

रेशनकार्ड, गॅस, केरोसीन, रस्ते, स्वच्छता, पाणीपुरवठा सुरळीत नसणे, जातपडताळणी व जातीचे दाखले, विद्युत जोडण्या, पाणीटंचाई, पतसंस्थेच्या ठेवीदारांचे प्रश्न, सार्वजनिक सुविधा, अतिक्रमण व त्यावरील कारवाई, पोलीस कारवाई, व्यापारी आंदालने, बँकामधील सुविधा, पुनर्वसन, भुसंपादन, धार्मिक भावना दुखावणे, पुतळा विटंबणा व इतर सामाजिक प्रश्नावर मोर्चे निघतात. शक्यतो नागरिकांना शासनामार्फत सुविधा पुरविल्या जातात त्या वेळीच पोहोचविणे ते होत नसल्यास त्याची कारणे स्वयंस्पष्टपणे तात्काळ नागरिकांना सांगणे, अभ्यांगतांशी सौजन्यपुर्वक बोलणे, त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी स्थानिक पातळीवर प्रामाणिक प्रयत्न करणे, भेटीसाठी दिलेल्या वेळेचे बंधन पाळून नागरिकांना भेटणे, शिष्टमंडळाशी चर्चा करुन त्याचे समाधान करणे, वरिष्ठ पातळीवरील धोरणात्मक निर्णय असल्यास त्यासाठी काय

पाठपुरावा केला हे सांगणे ह्या बाबी केल्यास लोकांचे समाधान निश्चित होते कारण त्यात त्या संबंधीत कार्यालय प्रमुखाचे या प्रश्नाशी संवेदनशीलता व प्रामाणिकपणा, सौजन्य ह्या बाबी महत्वाच्या ठरतात काही कार्यालयात या दिसून येत नसल्याचे माझ्याकडे सादर केलेल्या संघटनांचे म्हणणे आहे. या दोन्ही प्रकारात कोणकोणत्या बाबीमुळे अप्रिय प्रसंग उद्‌भवू शकतो याचा विचार केला असता.

**<u>प्रशासकीय स्तर -</u>**

१) नागरिकांच्या अर्जाचे वेळेवर निपटारा न होणे.
२) माहिती अधिकाराखाली RTI कायदा २००५ अन्वये १७ मुद्यावरील माहिती स्वत:हुन प्रसिध्द न करणे.
३) नागरिकांना न भेटणे, अथवा सौजन्याची वागणूक न देणे.
४) विलंबाचा कायदा असतानाही प्रकरण प्रलंबित ठेवणे व संबंधितावर कार्यवाही न होणे.
५) भेटीची वेळ निश्चित नसणे व असल्यास त्या वेळी नागरिकांना न भेटणे.
६) कार्यालयीन कामकाजामध्ये कार्यतत्परता नसणे व पारदर्शकता नसणे.
७) त्या बैठकीच्या दिवशी काही कर्मचारी संघटनांनी सांगितले की कार्यालय प्रमुख व कार्यालयीन कर्मचारी यांच्यात समन्वय नसल्यानेही असे प्रकार उद्‌भवण्यास कारणीभूत आहेत.
८) अनौपचारिक चर्चेतून काही बाबी दिसून आल्या कि, काही अधिकारी उपद्रव करणाऱ्या व्यक्ती यांना आर्थिक लाभ पोहचवून त्यांच्या विरुध्द ओरड होऊ नये म्हणून प्रयत्न करतात.
९) शासकिय विश्रामगृहात अशा उपद्रवी लोकांना विना आरक्षण खोल्या दिल्या जातात व त्यांचे वास्तव्यही तिथे असल्याचे अनौपचारिक चर्चेत समजून आल्या आहेत.
१०) वरील परिस्थितीमुळे अशा उपद्रवी लोकांकडून इतर खात्याच्या अधिकारी/कर्मचारी यांनाही व्यत्यय सुरु होतो त्यामुळे अप्रिय घटना घडतात.

**उपाय -**

१) अधिकारी कर्मचारी यांना कार्यसंस्कृती अभियान राबवून त्यांना समाजाप्रती उत्तरदायित्वासाठी प्ररित करणे.

२) प्रत्येक कार्यालय परिसरात दलाल / मध्यस्थ्यामार्फत कामे होत असल्यास अशा दलालांचा शोध घेवून त्यांचे संगनमत असणाऱ्या कार्मचारी व अधिकाऱ्यांविरुध्द कठोर कारवाई करणे.

३) 'नागरिकांची सनद' कोणते काम किती वेळेत होणार याची यादी जाहिर करणे.

४) सोमवार व मंगळवार हे मुख्यालय दिवस ठेवावेत व प्रत्येक अधिकाऱ्यांनी त्यादिवशी अभ्यागतांना भेटावेच. हे नियम जिल्ह्यातील सर्व क्षेत्रीय कार्यालयांनाही लागू करावे म्हणजेच जिल्हास्तरावरील कोणत्याही कर्यालयाने सोमवारी व मंगळवारी क्षेत्रीय अधिका-यांची सभा / बैठक बोलावू नये म्हणजे त्यांना नागरिकांना भेटता येईल.

५) तहसिलदार व जिल्हाधिकारी क ार्यालयात महसूल खात्याव्यतिरिक्त इतर खात्याच्या प्रश्नाविषयी मोर्चा / आंदोलन असल्यास त्या विभागाचे जिल्हास्तरीय अधिकारी यांनी शिष्टमंडळ जिल्हाधिकारी / निवासी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देताना त्या विषयाच्या माहितीसह हजर रहावे की जेणेकरुन आंदोलकांना त्याचवेळी त्याची माहिती होवू शकेल.

६) मोर्चा / आंदोलन ज्या विषयावर असते त्या विभागाचे अधिका-यांनी आपल लेखी म्हणणे आंदोलकांना आंदोलनापूर्वीच देवून समाधान केल्यास आंदोलन / मोर्चा निघणार नाहीत.

७) उपोषण स्थळी संबंधित खात्याने अधिकारी यांनी भेट देवून किंवा त्यांना कार्यालयात बोलावून पहिल्याच दिवशी दखल घेवून उपोषण सोडविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे असे वाटते. त्यामुळे गुंतागुंत कमी होईल. आमरण उपोषण असल्यास प्रत्येक दिवशी उपोषणकर्त्यांची आरोग्याधिका-यामार्फत वजन नोंद केल्यास काही केवळ स्टंटबाजीसाठी उपोषण करणा-यांचा खोटेपणा लक्षात येईल कारण आमरण उपोषणाचे मंडप मांडून सायंकाळी गायब व पुन्हा दुस-या दिवशी जेवण करुन आमरण उपोषण करणा-यांची उदाहरणे आहेत. त्यामुळे खरोखर प्रश्नासाठी बसणा-या व्यक्तीकडे दुर्लक्ष होणार नाही.

८) कोणत्याही अभ्यागताने लिपीकाच्या टेबलवर भेटण्याऐवजी प्रत्यक्ष अधिका-यांनाच भेटणे इष्ट राहील. काही कार्यालयात स्वत: अधिकारीच त्या लिपीकाला विचारा असे सांगतात. त्यामुळे कार्यालयीन शिस्त राहत नाही.

९) रिक्त पदे, रजेवर असणा-यामुळे कार्यालय प्रमुखांवर ताण पडतो. अशावेळी काही प्रकरणे विलंबाने होतात ही वस्तुस्थिती असते. अशावेळी नागरिकांमध्ये असंतोष होतो. त्यास कारण नसताना त्या कार्यालय प्रमुखावर रोष तयार होतो.

१०) अधिकारी / कर्मचारी कार्यालयीन वेळेत न येणे ही सर्वात महत्वाची समस्या आहे. त्यामुळे नियमित वेळेवर कामकाज होत नाही.

११) कर्मचा-यांना अर्ज, कागद व कार्यालयीन साहित्य नसल्याने स्वत:च्या पैशातून आणून टंकलिखित करावे लागते. तसेच संगणक, प्रिंटर्स, टोनर सारख्या बाबी वेळेवर दुरुस्त न झाल्याने प्रकरणे प्रलंबित राहतात. त्यामुळे कार्यालय प्रमुखानी या बाबीकडे लक्ष देणे

आवश्यक वाटते. जेणेकरुन प्रकरणे वेळेवर निपटारा होतील.

१२) प्रत्येक कार्यालयासमोर KIOSK बसवून सर्व शाखेची माहिती त्या S TAND ALONE KIOSK वर प्रसिध्द करावी म्हणजे एकाच ठिकाणी माहिती मिळेल.

१३) शाहुवाडी तहसिल कार्यालयात अभ्यागतांना भेटण्यासाठी व त्यांचे अर्जावर निर्णय कळविण्यासाठी उत्कृष्ट कार्यपध्दती अवलंबिली जाते. ते जिल्हाभर लागू केल्यास अतिशय सुलभ होईल.

१४) निवेदन स्वीकारल्यानंतर त्यासाठी पाठपुरावा केला जात नाही. पाठपुरावा करुन ती बाब आंदोलनकर्त्यांना कळविणे गरजेचे आहे.

१५) Website वर त्या त्या खात्याची माहिती प्रसिध्द करणे व अद्यावत ठेवणे. त्यामुळे नागरिकांना माहिती मिळेल व पारदर्शकता राहील.

१६) पारदर्शकता व अचूक वेळेवर कामे होणे या बाबीचे तंतोतंत पालन केल्यास नागरिकांमध्ये असंतोष निर्माण होणार नाही.

## <u>शिष्टमंडळे / आंदोलने / मोर्चे यामध्ये असणा-या त्रुटी -</u>

१) अचानकपणे पूर्वकल्पना न देता काही आंदोलने होतात व त्या संबंधित अधिका-यांना त्याची कल्पनाही नसते व अचानक कार्यालयात शिष्टमंडळ घुसते.

२) शिष्टमंडळाचे नेतृत्व करणा-या नेतृत्वाने किंवा त्यामधील जाणकार व प्रश्न माहीत असणा-या व्यक्तीने शांतपणे प्रश्न मांडल्यास प्रशासनासही त्याची नोंद घेता येते. परंतु शिष्टमंडळातील अनेक व्यक्ती एकाच वेळी अनेक जण मोठमोठयांनी बोलतात. त्यामुळे निवेदन घेणा-यावर दबाव येतो व गोंधळाचे वातावरण निर्माण होते. Video चित्रीकरण असल्यास त्यामधील अनेकजणांना प्रसिध्दी माध्यमात प्रसिध्दी मिळविण्यासाठी जोरजोराने बोलून अधिका-याला कसे घाबरविले किंवा त्याची अवस्था कशी केली हे दाखविण्याचा प्रयत्न काही लोकांकडून होतो हे सुध्दा मोर्चे / आंदोलनाची कल्पना पोलीसांना नसणे ही अतिशय गंभीरबाब आहे.

कारण बंदोबस्त नसल्याने काही वेळा संतप्त जमावाकडून गैरवर्तणूक होवून कायदा - सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो.

३) मुंबई पोलीस अधिनियम ३७ (१) (३) या अन्वये प्रतिबंधात्मक आदेश असतानाही व क्रिमीनल प्रोसिजर कोड १९७३ चे कलम १४४ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश असतानाही या बाबी घडतात. म्हणजेच सदर आंदोलनाची कल्पना पोलीसांना नसते. तसेच या आदेशांचा भंग झाल्यास त्या विरुध्द कार्यवाही करणेची जबाबदारी पोलिसांची असते.

४) जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालयातील D. S. B. शाखा / गुप्तहेर शाखेने अशा आंदोलनाविषयी / मोर्च्याविषयी आगावू कल्पना त्या कार्यालय प्रमुखांना देणे अपेक्षित आहे.

५) पोलीस अधिकारी समोर असतानाही त्यांना बाजूला सारुन निवेदन देण्यासाठी नागरिक घुसतात हे मागील काळात जिल्हाधिकारी कार्यालयात घडलेले आहे. म्हणजेच

पोलीसांच्या निर्देशाचे पालन करणे नागरिकांना बंधनकारक आहे व तसे घडल्यासस विनावॉरंट त्यांना अटक करणे गरजेचे असते. पोलीसांसमोर एखाद्या सार्वजनिक मालमत्तेची हानी आंदोलकांकडून होत असते. कार्यालयीन खूर्च्या बाहेर फेकल्या जातात. अशावेळी सार्वजनिक मालमत्तेस हानी पोहोचते. त्यामुळे पोलीसांनी स्वत:हून FIR व गुन्हे नोंदविणे अपेक्षित असते, जबाबदार नागरिकांच्या वर्तनाशी सुसंगत नसून किंवा त्या प्रश्नानी तळमळ नसून केवळ प्रसिध्दीसाठी केल्याचे दिसून येते.

६) Right to Protest, Right to Expression, Right to Speech या बाबी घटनेच्या परिच्छेद १९ मध्ये दिल्या असल्या तरी ही घटनेच्या तरतुदीनुसार नागरिकांची कर्तव्येही दिलेली आहेत. व मुंबई पोलीस अधिनियम १९५१ नुसार आंदोलनकर्त्यांनी पोलीस अधिका-यांच्या निर्देशानुसार रस्त्यावर जाताना सामान्य नागरिकांना व्यत्यय होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दररोज मोर्चे / आंदोलन असतात. अशावेळी रस्ता अडवून उभे राहणे, मोठमोठयांनी घोषणा देणे, लाऊड स्पीकरवर मोठमोठयांनी बोलणे, अपशब्द वापरणे, बेजबाबदार वक्तव्ये करणे, अशा घटना घडू शकतात. त्यामुळे या परिसरातील नागरिकांची, रहिवाशांची व रहदारीमध्ये व्यत्यय / उपद्रव निर्माण होतो याची दक्षता मोर्च्याचे नेतृत्व करणा-या प्रमुखांनी व पोलीसांनी घेतले पाहिजे. मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३३ (ओ) नुसार नियमावली बनविणे आवश्यक वाटते. पोलीस विभागाकडून याविषयी प्रस्ताव घेवून याविषयीचे नियम केल्यास कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील.

७) आंदोलनकर्त्यांनी पूर्वपरवानगी न घेता कार्यालय परिसरात गैरवर्तणूक करत असतील, अपशब्द वापरत असतील , अधिका-यांना धमक्या देत असतील तर त्यांचेविरुध्द IPC 447 ( Criminal Tresspass ) चा गुन्हा नोंद होणे अपेक्षित आहे.

**उपाय :-**

१) आंदोलनकर्त्यांनी किमान ३ दिवस अगोदर त्या अधिका-यास व त्या पोलीस स्टेशनला लेखी म्हणणे देवून आंदोलनाची तारीख व वेळ द्यावी म्हणजे त्या निवेदन घेणा-या अधिका-याला पूर्वकल्पना असेल.

२) संबंधित पोलीस स्टेशन अधिका-यांनी सदर मोर्च्याविषयी व त्यांच्या मागणीविषयी लेखी कल्पना संबंधित अधिका-यांना देणे अपेक्षित आहे व त्यांना मोर्च्याची परवानगी दिली किंवा नाही याही बाबी नमूद करणे आवश्यक आहे.

३) पूर्वपरवानगीशिवाय तसेच मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) आदेश असताना पूर्वपरवानगीशिवाय मोर्चे निघाल्यास कलम १३५ व इतर अनुषंगिक कायद्याखाली गुन्हे नोंदविण्याची तरतूद आहे. परंतु गुन्हे नोंदविले जातात. दोषारोपपत्र सादर करुन पाठपुरावा केल्यास उपद्रवी लोकांना शिक्षा होवू शकते.

४) अतिशय निकडीचा विषय असल्यास संबंधित अधिका-याशी दूरध्वनीवरुन बोलून, PSO शी बोलून त्यांची परवानगी घेवून आंदोलक मोर्च्या काढू शकतात पण

मोर्च्याचे नेतृत्व करणा-यांनी लेखी हमी दिली पाहिजे की, कोणतीही गैरवर्तणूक होणार नाही व सार्वजनिक दैनंदिन रहदारीला अडथळा न आणता नागरिकांना उपद्रव न होता मोर्च्यांना परवानगी द्यावी अन्यथा देवू नये.

५) जिल्हाधिकारी कार्यालय / तहसिल कार्यालये ही नेहमीची आंदोलनाची ठिकाणे असून अथवा अनेक शिष्टमंडळ भेटत असतात व एखादी अप्रिय घटना घडते म्हणून CCTV कॅमेरे लावावेत व अधिका-यांच्या केबीनमध्ये ही CCTV लावावे. जेणेकरुन त्याची नोंद होईल व गैरवर्तणूक करणा-याविरुध्द कार्यवाहीसाठी पुरावा असू शकतो.

जिल्हाधिकारी कार्यालयात (१+३) चा कायमचा पोलीस बंदोबस्त ठेवणे अथवा पोलीस चौकी ठेवणे अत्यावश्यक वाटते. कारण पतसंस्था गैरव्यवहार आंदोलने, CPR विषयीची आंदोलन, आकस्मिकपणे एखादा आत्मदहन करण्यासाठी येतो. अशावेळी कर्मचा-यांची धावपळ होते व भितीचे व गोंधळाचे वातावरण होते. म्हणून (१+३) चा कायमचा बंदोबस्त ठेवावा

६) मोर्च्या काढताना अपशब्द वापरणे, शिवराळ भाषा वापरणे यास प्रतिबंध करणे व या व्यक्तीविरुध्द सार्वजनिक ठिकाणी असभ्य वर्तणूक म्हणून गुन्हा नोंद करणे.

७) संबंधित पोलीस स्टेशन अधिका-यांनी यथायोग्य बंदोबस्त लावावा. कारण दिनांक १९/०३/२०१२ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात ज्या आंदोलनकर्त्यांना ताब्यात घ्यावयाचे होते. त्यासाठी किमान अर्धा तास वेळ लागता व त्यांची पोलीसांसोबत अर्धा तास विरोध / झटापट सुरु होती.

८) सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई करुन घेण्याविषयी कायद्यात तरतूद आहे. पण ही कारवाई होत असल्याचे दिसून येत नाही. ती करण्यात यावी.

९) निवेदने स्वीकारण्यासाठी दुपारी ३ ते ५ ही वेळ असावी व मोर्चा किती वाजता सुरु होणार, कोणत्या मार्गाने येणार व किती वाजता पोहोचणार व निवेदन किती वाजता देणार, याचे पालन सर्वसाधारणपणे होत नाही व वेळ निघुन गेल्यामुळे साहजिकच त्या काळात अधिका-यांना दुस-या कामात व्यस्त राहणे असते किंवा इतर महत्वाचे काम असते. त्यामुळे अधिकारी वेळेवर उपलब्ध होत नाहीत अशा वेळी गैरसमज तयार होवून गोंधळ होतो. निवेदन दिलेल्या वेळीच द्यावे. परंतु सकाळी ११-०० वाजता ठरल्यानंतर दुपारी १ नंतर येण्याचे प्रकार घडतात. असे असल्यास मोर्च्यास परवानगी देवू नये.

१०) शिष्टमंडळात जास्तीत जास्त ५ व्यक्तीच निवेदन देताना असाव्यात. कारण चर्चा सुलभ होवू शकते. याविषयी मुंबई पोलीस अधिनियम कलम ३३ (ओ) नुसार नियम बनविता येतो.

११) मोर्चेकरी जिल्हाधिकारी कार्यालय / तहसिल कार्यालयासमोरील रस्त्यावर कित्येक वेळ रस्ता अडवून उभा राहतात. रहदारीस अडथळा होवून नागरिकांची गैरसोय होते.

म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयावर येणारे मोर्चेक-यांसाठी शेजारी असलेल्या महावीर उद्यानात उभे राहण्यासाठी नियम करता येईल.

१२) मोर्च्या / आंदोलनात दुचाकी / चारचाकी वाहनाव्दारे आंदोलनास प्रतिबंध करावा. कारण या बाबी सुध्दा रहदारीस व स ामान्य जनजीवनास अडथळा आणणा-या आहेत.

मोर्चा / आंदोलन / निषेध हा सांविधानिक अधिकार असला तरी त्यास संविधानार्तगंत व सुसंगत बनविलेले कायदे जसे मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३, ३७ (१) (३) , C.R.P.C. १४४ अंतर्गत दिलेले निर्देश, पोलीस अधिका-याच्या निर्देशाप्रमाणे वर्तणूक या बाबी सुरक्षा लोकशाही प्रणाली संविधानाच्या कक्षेतच येतात व त्याचे पालन होत नसल्यास ते बेकायदेशीर असून असे वर्तन करणारा आंदोलक कोणीही असला तरी ही ती व्यक्ती सांविधानिक कर्तव्याचे पालन करीत नाही असा होतो. म्हणून त्या त्या वेळी कायदेशीर कारवाई करावी / करणे असे अभिप्रेत आहे.

# मोर्चा / आंदोलनासाठी सर्वसाधारण नियमावली

♦ मोर्चा आंदोलने शांततेत व सुव्यवस्थेत पार पाडण्यासाठी तसेच आंदोलक व प्रशासन यांच्यात समन्वय व सुसूत्रता राखण्यासाठी नियमावली.

१) मार्चा/ आंदोलन/ शिष्टमंडळ/ वैयक्तीक निवेदनातील प्रश्न हे ज्या खात्याशी संबंधीत असतील त्या खात्याच्या अधिकाऱ्याची पूर्व परवानगी घेवून (कारण अधिकारी रजेवर अथवा दौऱ्यावर असू शकतात) प्रत्यक्ष भेटून प्रश्नाविषयी चर्चा करुन घ्यावी. व समाधान झाले नसल्यास त्या संबंधी लेखी निवेदन देवून संबंधीत खाते प्रमुखाकडून लेखी उत्तर प्राप्त करुन घ्यावे. कारण त्यामुळे जवळजवळ ५० % प्रश्न त्याच ठिकाणी सुटू शकतात. त्यामुळे मोर्चे व आंदोलनाची गरज भासणार नाही.

२) वरील प्रमाणे जेव्हा आंदोलन कर्त्यांस वाटते की, या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधणे आवश्यक वाटते व त्यासाठी तालुका कार्यकारी दंडाधिकारी / उपविभागीय दंडाधिकारी /अप्पर जिल्हादंडाधिकारी/ जिल्हादंडाधिकारी यांचेकडे लेखी निवेदन द्यावयाचे असेल त्यावेळी कायदा व सुव्यवस्थेचा भंग होवू नये म्हणून परवानगी घेवून परवानगीचे अटीस व शर्तीस अधिन राहून निवेदन / मोर्चा / आंदोलन शांततामय मार्गाने करणेस हरकत नाही. याबाबत खालील नमुद केलेल्या कार्यपध्दती नुसार कार्यवाही करणे अपेक्षीत आहे.

३) तालुका कार्यकारी दंडाधिकारी / उपविभागीय दंडाधिकारी /अप्पर जिल्हादंडाधिकारी/ जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडे निवेदन / मोर्चा/ आंदोलन करणेसाठी संबंधीतांनी मोर्चा / आंदोलनाची सुरवात कोठून होणार कोणत्या मार्गाने जाणार / किती वाजता निवेदन देण्यासाठी कार्यालयाजवळ जाणार याचा तपशील नमुद करुन किमान तीन दिवस अगोदर निवेदन / मोर्चा / आंदोलनाच्या बाबत संबंधीत खात्याच्या उत्तराच्या प्रतिसह व निवेदन देणाऱ्या शिष्ठमंडळाने जास्तीत जास्त पाच व्यक्तींची नावे देवून संबंधीत पोलीस स्टेशनची परवानगी घ्यावी.

५) संबंधीत पोलीस स्टेशन प्रमुखांनी निवेदन / मोर्चा/ आंदोलनाच्या अर्जा बाबत परवानगी देणे अथवा परवानगी न देणे याबाबतचा निर्णय त्याच दिवशी अथवा अपवादात्मक परिस्थितीत दुसरे दिवशी घ्यावा. परवानगी दिली असलेस मोर्चाचे/ आंदोलनाचे रुपांतर मैदानावर सभेत होवून मागण्यांविषयी भाषण करणार असतील तर त्यांची नावे सभेच्या आयोजनासाठी पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या सुचना इ. तपशीलासह त्या संबंधीत परवानगी आदेशाची प्रत, निवेदनाची प्रत व प्रतिवेदन अहवाल हा ज्या अधिकाऱ्याकडे मोर्चा/ आंदोलन निवेदन दिले जाणार आहे त्या अधिकाऱ्याकडे त्याच दिवशी टपाला मार्फत न पाठविता कॉन्स्टेबल मार्फत द्यावा. (प्रतिवेदनाचा नमुना सोबत जोडलेला आहे.)

६) आंदोलन / मोचाची परवानगी मागत असतानाच निवेदनाची प्रत ज्या अधिकाऱ्याकडे आंदोलन मोर्चा काढणार आहेत त्यांचेकडे त्याच दिवशी द्यावीत. जणेकरुन कमीत कमी वेळेत ते

अधिकारी त्या विषयाची तयारी करुन ठेवतील.

७) निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या अनुपस्थित उपजिल्हाधिकारी महसुल व दोघांच्याही अनुपस्थितीत इतर उपजिल्हाधिकारी (निवडणुक, रोहयो) किंवा निवासी उपजिल्हाधिकारी यांचा कार्यभार ज्यांच्याकडे असेल त्यांच्याकडेच निवेदने स्वीकारली जातील.

८) डिएसबी शाखेचा / गुप्तहेर खात्याचा कर्मचारी सातत्याने या आंदोलनादरम्यान माहिती संकलनासाठी ठेवणे आवश्यक आहे.

९) आंदोलनाच्या तारखेपुर्वीच निवेदनाची प्रत आगाऊ पाठविल्यास संबंधित अधिकारी त्या विषयाचा अभ्यास करुन आंदोलनाच्या दिवशी समर्पक उत्तर देवु शकतात कारण मागण्यांवर अभ्यास करण्यासाठी वेळ मिळतो.

१०) शांतता व सुव्यवस्थेचा भंग होईल अशा तऱ्हेची कृती करणाऱ्यांच्या विरोधात तात्काळ गुन्हे दाखल व्हावेत.

११) जिल्हाधिकारी कार्यालयात त्याचप्रमाणे ज्या कार्यालयावर मोर्चा काढणेची, निवेदन देण्याची संख्या जास्त असेल अशा कार्यालयात सी. सी. टिव्ही कॅमेरे बसवून ते बसविलेबाबतची सूचना कार्यालयाचे दर्शनी भागात लावणेत यावे.

१२) मोर्चाचे वेळी, निवेदन देतेवेळी जर शासकीय मालमत्तेचे नुकसान केले गेले तर ते संबंधीतांकडून भरुन घेतले जाईल याच नोंद घेणेविषयी कार्यालयाच्या दर्शनी भागात कायम स्वरुपी नोटीस बोर्ड लावावा.

१३) आंदोलकांनी मोर्चा / मेळावा / सभा हे कोणत्या ठिकाणापासून सुरु होणार व कोणत्या ठिकाणी विसर्जित होणार. निवेदन किती वाजता संबंधित अधिकाऱ्याला देणार याचाही तपशील पुर्वसुचनेच्या पत्रात अथवा पोलीस स्टेशन अधिकारी यांचेकडे परवानगी घ्यावयाच्या अर्जात नमुद करावे (त्यामुळै पोलीस बंदोबस्त, मोर्च्याचा मार्ग, कोठून सुरु होणार व विसर्जित होणार व अचुक कोणत्या वेळी संबंधित कार्यालयात पोहोचणार याची तयारी करता येते.)

१४) मोर्चा ऐवजी केवळ शिष्टमंडळ जाणार असल्यास त्याची सुध्द्रा पुर्वकल्पना देऊनच अधिकारी जागेवर आहेत किंवा नाही याची खात्री करुन घ्यावी. (कारण यापुर्वी कोणतीही पुर्वकल्पना न देता अचानक कार्यालयात १०-१५ जनांच्या समुहाने येऊन निवेदन देण्यासाठी आग्रही असतात व ते अधिकारी जागेवर नसल्याने नाराज होऊन गांधळ घातल्याची उदाहरणे आहेत. यामुळे हे टाळता येऊ शकते.)

१५) निऊजि/जिल्हाधिकारी/उविआ/तहसिल कार्यालये / केबीन समोर व आत CCTV कॅमेरे बसवावेत (फायदे - अपशब्द अथवा गैरवर्तणूक लक्षात येईल अधिकारी उध्दट वागत असल्यास अथवा आंदोलकापैकी कोणीही गैरवर्तणुक करित असल्यास त्या बाबींची नोंद होईल.)

१६) निवेदन देताना त्या कार्यालय परिसर अथवा रस्त्यावर दुसऱ्यांच्या भावना दुखावल्या जातील असे वर्तन अथवा पुतळा जाळणे अथवा शिवीगाळ अथवा पोलीसांच्या निर्देशांचे पालन न करणाऱ्यांविरुध्द त्याच ठिकाणी कार्यवाही करावी म्हणजेच विनावारंट अटक करुन कलम

१३४, १३५ अन्वये कार्यवाही करतील. मुंबई पोलीस अधिनियम कलम ७० अन्वये ३७(१) (२) (३) आदेश असल्यास अशा वर्तणुकीसाठी पोलीस अटक करु शकतात.

१७) मोर्चा अथवा मिरवणुकीत नागरिकांनी रस्त्यास म्हणजेच सार्वजनिक रहदारीस अडथळा होईल अशा पध्दतीने मिरवणुक काढता येणार नाही. त्यासाठी पोलीसांच्या निर्देशाप्रमाणेच अनुपालन करणे बंधन कारक आहे. [मु. पो. अधिनियम कलम ३६ व ३७ (१) (२) (३)]

१८) दुचाकी, तीनचाकी अथवा चारचाकी वाहने मिरवणुका / मोर्चात समावेश करुन मोर्चे काढता येणार नाही कारण यामुळै दैनंदिन जनजीवनास व्यत्यय निर्माण होतो.

१९) ध्वनी क्षेपकाची परवानगी घेऊनच मिरवणुकीत त्याचा वापर करता येईल. कोणत्याही परिस्थितीत ७५ डेसिबल पेक्षा जास्त तीव्रतेचा आवाज करता येणार नाही. [Noise pollution control order 2010]

२०) मोर्चा / आंदोलनकर्ते ह्यांनी रस्त्यावर अथवा चौकात थांबता कामा नये. त्यांच्यासाठी महावीर गार्डनच्या एका कोपऱ्यात जी रिकामी जागा आहे तिथेच त्यांनी थांबावे व तेथेच मोर्चा / आंदोलनाचे विसर्जन करावे.

२१) महावीर गार्डनमध्ये जमलेल्या आंदांलकांमधून केवळ पाच व्यक्तींना निवेदन देण्यासाठी येता येईल. त्यांची नावे पूर्वीच कळविलेली असावी.

**अपर जिल्हाधिकारी, कोल्हापूर**